सदा - १४-८-१९

# Government Medical College, Nagpur
# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर
## Tel No. MCH Nagpur Phone No. 2743588
## कंत्राटी पदे भरती जाहिरात.

राष्ट्रीय DDAP कार्यक्रमाअंतर्गत आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय भारत सरकार पुरस्कृत Drug Treatment Center योजना करिता कंत्राटी पदे भरावयाची आहेत.

| अनु. क्र. | पदाचे नाव | पद संख्या | नियुक्तीचे ठिकाण | वय | शैक्षणिक अर्हता | एकत्रित मानधन |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | वैद्यकीय अधिकारी | १ | शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय नागपूर | ३८ (शासकीय सेवे मधुन निवृत्त असल्यास ६१ वय) | MBBS with PG Degree/Diploma in Psychiatry Preferred/ MBBS | रू. ४५०००/- दरमहा एकत्रित मानधन. |
| २ | परिचारिका | १ | | ३८ (शासकीय सेवे मधुन निवृत्त असल्यास ६० वय) | GNM B-Sc Nursing | रू. १५०००/- दरमहा एकत्रित मानधन |
| ३ | समुपदेशक | १ | | ३८ (शासकीय सेवे मधुन निवृत्त असल्यास ६० वय) | Minimum recognized qualification -Master in social work/ Humanities/ Sociology/ Psychology Preferred Certificate training in counseling | रू. १५०००/- दरमहा एकत्रित मानधन |

**अटी व शर्ती:**

ही पदे राज्य शासनाची पदे नसून निव्वळ कंत्राटी स्वरुपातील पदे आहेत. सदर पदांसाठी शासनाचे सेवा नियम लागु होणार नाहीत. सदर नियुक्त्या केंद्र शासनाचे प्रकल्पाअंतर्गत असुन प्रकल्पाचे काम संपुष्टात आल्यास नियुक्त्या आपोआप संपुष्टात येतील.

१. पदांची संख्या ही गरजेनुसार बदलण्याची शक्यता आहे.
२. वैद्यकिय अधिकारी पदावरील उमेदवार उपलब्ध होत नसल्याने सदर पदाकरीता शासकिय सेवेतुन निवृत्त झालेल्या पात्र अर्हता धारता उमेदवारांकरीता सेवा प्रवेशाची कमाल वयोमर्यादा वय ६१ वर्ष व सेवासमाप्त वय ७० वर्ष ठेवण्यात येत आहे.
३. उपरोक्त पदासाठी संबंधीत कौन्सिल कडून प्राप्त प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.
४. आवश्यक पात्रता असलेले उमेदवार न मिळाल्यास त्या पदांकरिता असलेली पात्रता अनुभव व अर्हता नुसार शिथिल करण्याचे अधिकार निवड समितीने राखून ठेवलेले आहेत.
५. पदासाठीचे मानधन हे सर्व एकत्रित मानधन आहे.
६. नियम व अटीच्या अधीन राहून नियुक्ती आदेश देण्यात येतील. उमेदवारांची नियुक्ती ही गुणांकनानुसार करणेत येईल. उच्च शैक्षणिक अर्हता धारकास व अनुभव असलेल्या उमेदवारास प्राधान्य दिले जाईल.
७. केवळ शासकीय व निमशासकिय अनुभव ग्राह्य धरणेत येईल.
८. नियुक्ती उमेदवाराकडून नियुक्ती कालावधीमध्ये बेशिस्त वर्तन, कामात कुचराई झाल्यास संबधिताना कार्यमुक्त करण्याचे अधिकार निवड प्राधिकरणकडे राखून ठेवण्यात आलेले आहेत.
९. उपरोक्त प्रवर्गातील उमेदवार प्राप्त न झाल्यास इतर उपलब्ध सर्व पात्र उमेदवारांच्या उपलब्ध अर्जांमधुन गुणानुक्रम निवड करण्यात येईल.
१०. उमेदवाराने अर्ज, मुळ कागदपत्रे व त्यांच्या साक्षांकित प्रतीसह थेट मुलाखतीस उपस्थित रहावे.
११. अर्जाच्या छाननीत पात्र ठरलेल्या उमेदवारांचीच मुलाखात घेण्यात येईल.
१२. संबधित पदांकरिता पात्र उमेदवार मुलाखतीकरीता आल्यास पदवी/ पदव्युत्तर पदवी मधील अंतिम वर्षातील गुणानुक्रमानुसार १:५ (एका पदाकरिता ५) याप्रमाणे मुलाखतीस बोलवण्यास येईल.
१३. कोणतीही पूर्व सूचना न देता निवड प्रक्रिया व निकष बदलण्याचे किंवा रद्द करण्याचे अधिकार निवड समितीने राखुन ठेवलेले आहेत.
१४. प्राप्त अर्जाची छाननी केल्या नंतर प्राप्त गुणानुक्रमे उमेदवारांना ई-मेल/मोबाईल एस.एम.एस./ दुरध्वनी व इतर माध्यमाद्वारा मुलाखत/ लेखी परिक्षेकरीता बोलविण्यात येईल.
१५. अर्जदाराचे अर्ज कोऱ्या कागदावर करावयाचे असून त्यामध्ये खालील बाबी अंर्तगत असाव्यात.
    १. १. अर्ज केलेल्या पदाचे नाव, २. अर्जदाराचे नाव, ३. अर्जदाराचा पदनाम, ४. दूरध्वनी....भ्रमणध्वनी क्रमांक, ५. ई-मेल आयडी, ६ जन्मदिनांक, ७. कामाचा अनुभव.. काम केलेली संस्था, धारण केलेले पद व कालावधी, ८. शैक्षणिक अर्हतेची संपूर्ण माहिती
    २. अभ्यासक्रमाचे नाव, संस्था, विद्यापिठाचे नाव, उत्तीर्ण झालेले वर्ष, गुणांचा तपशील व टक्केवारी, १ पासपोर्ट साईज फोटो.
    ३. आवश्यक कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती व मूळ कागदपत्रे खालीलप्रमाणे, १. शैक्षणिक अर्हतेची सर्व प्रमाणपत्रे व सर्व गुणपत्रके २. शाळा सोडल्याचा दाखला, जन्म तारीखेचा दाखला ३. जातीचा दाखला व जात वैधता प्रमाणपत्र ४. अनुभव प्रमाणपत्र ५. नावात बदल असल्यास मॅरेज सर्टिफिकेट अथवा गॅझेट आवश्यक.

**मुलाखतीची वेळ ईमेल / मोबाईल एसएमएस / दुरध्वनी व इतर माध्यमांद्वारा कळविण्यात येईल.**

**अर्ज स्विकारण्याची वेळ व ठिकाण--जाहीरात प्रसिध्दीच्या दिनांकापासुन १० दिवसाचे आत :-** कार्यालय, मानसिक आरोग्य विभाग, वार्ड नंबर ४५, दुसरा माळा, शासकिय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर सकाळी ९.४५ ते ५.४५ (कार्यालयीन वेळेवर शासकिय सुटटीचा दिवस वगळून)

**स्वाक्षरी/-**
**अधिष्ठाता,**
**शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,**
**नागपूर**

(सं. माहिती-नाग./४७७/२०१९)

Applications are invited for the vacant post of Medical Officer (1) and Nurse (1) purely on contractual basis.

Terms and conditions will be as per the advertisement published in Maharashtra Times dated 14-08-2019.

**Dr. Prashant Gokul Tiple**
Nodal Officer,
Drug Treatment Clinic,
Prof. & head, Dept. of Psychiatry
Govt. Medical College & Hospital.
...r - 440003, Maharashtra
Mo - 9890885118